## गणेश विसर्जन बंदोबस्त प्रेस नोट दिनांक १०/०९/२०१९

दिनांक १२/०९/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता पुणे शहरातील सार्वजनिक गणपतींचे विसर्जन सुरवात होणार आहे. गणेश विसर्जन मिरवणुका लक्ष्मी रोड, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता, कर्वे रस्ता, लष्कर, खडकी, दत्तवाडी, मुख्यत: खालील मार्गांनी/भागातून जाणार आहेत.

- मुख्य मिरवणुक मार्ग सेक्टरमध्ये विभागण्यात आले असुन, प्रत्येक सेक्टर करीता पोलीस उप आयुक्त तसेच सहा.पोलीस आयुक्त दर्जाचे अधिकारी, इनचार्ज म्हणुन देण्यात आलेले आहेत. प्रमुख विसर्जन मिरवणुका शहराच्या मध्यवर्ती भागातून निघणार असुन, सदर भागात विशेष बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.
- मिरवणुकीचे मार्गाचे बीडीडीएस एकुण ७ टिमच्या मदतीने घातपात विरोधी चेकींग करण्यात येत आहे. तसेच प्रमुख मार्गाला जोडणाऱ्या गल्लीबोळ, उंच इमारती, वॉच टॉवर, विसर्जन घाट, पोलीस मदत केंद्रे, स्वागत कक्ष, बॅरेकेडींग पॉइंट, अॅम्बुलन्स व वैद्यकीय पथके, जिवरक्षक, फायर ब्रिगेड, एम .ई सी.बी.विभाग अशा प्रकारे बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.
- फरासखाना नियंत्रणकक्ष व मुख्य नियंत्रणकक्ष याठिकाणी रिझर्व फोर्स, स्ट्रायकींग वाहनासह ठेवण्यात आलेला असुन, ५ जलद प्रतिसाद पथके, वज्र, लिमा, वरूण व ५ दंगल नियंत्रण पथके , शिवाजीनगर मुख्यालय येथे ०४ स्ट्रायकिंग फोर्स व मुख्य नियंत्रण कक्ष पुणे शहर येथे २ स्ट्रायकिंग फोर्स राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. बेलबाग चौक याठिकाणी फिरते नियंत्रणकक्ष ठेवण्यात आलेले असुन,टिळक चौक याठिकाणी ९० कर्मचारी राखीव ठेवण्यात आलेले आहेत, फरासखाना नियंत्रण कक्ष याठिकाणी ७० कर्मचारी व एसपी कॉलेज चौक याठिकाणी २५ कर्मचारी राखीव ठेवण्यात आले असुन, पुणे शहरातील ५ परिमंडळनिहाय स्पॉटर किट,बीडीडीएस पथके यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- बंदोबस्ताकरीता साध्या गणवेषात पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले असुन, वाहतुक नियंत्रणासाठी वाहतुक शाखेकडील वेगळा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. विसर्जन मिरवणुकीच्या प्रमुख मार्गावर ३९ ठिकाणी एकुण १९९ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आलेले असुन, त्याव्दारे, मिरवणुकीतील प्रत्येक हालचालीवर सी.सी.टी.व्ही. कंट्रोल रूम मधुन नजर ठेवण्यात येणार आहे.
- नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. काहीही संशयीत व्यक्ती अगर वस्तु निदर्शनास आल्यास पोलीस नियंत्रणकक्ष येथे १०० क्रमांकावर संपर्क साधावा व गणेशाचे विसर्जन शांततेत पाडण्याकरीता प्रशासनास सहकार्य करावे.तसेच सोशल मिडियावरील कोणत्याही पोस्टवर योग्य खातरजमा केल्याशिवाय विश्वास ठेवु नये.
- पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये गणेशोत्सव कालावधीत ढोल ताशा पथके, म्युजिक सांऊंड सिस्टिम यांच्या आवाजाची मर्यादा राखणेकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ प्रमाणे निर्देष देण्यात आलेले आहेत.

- लक्ष्मी रोड मिरवणूक मार्ग - लक्ष्मी रोड - अल्पना टॉकीज - गणेश पेठ - तांबोळी मशिद चौक - साम्या मारुती चौक - बेलबाग चौक - गणपती चौक - सेवा सदन चौक - उंब-या गणपती चौक - विजय टॉकीज चौक - अलका टॉकीज चौक - खंडुजीबाबा चौक एकुण विसर्जन गणपती - २९०
- <u>टिळक रोड मिरवणूक</u> मार्ग -सारसबाग - सणस पुतळा चौक - आदमबाग मस्जिद - वसंतदादा पुतळा चौक - एस.पी.कॉलेज - बादशाही बोर्डिंग चौक - तनपुरे महाराज चौक -अलका टॉकीज चौक - डावीकडे वळून शास्त्री रोड - गांजवे चौक - उजवीकडे वळून पत्रकार भवन - एस.एम.जोशी ब्रिज एकुण विसर्जन गणपती - ११६
- <u>कुमठेकर रोडवरील मिरवणूक</u> मार्ग - शनिपार चौक - फडतरे चौक - सदाशिव होद चौक - चित्र शाळा चौक - जोंधळे चौक - अलका टॉकीज चौक - लकडी पुल एकुण विसर्जन गणपती - ४६
- <u>केळकर रोडवरील मिरवणूक</u> मार्ग - दक्षिण मुखी मारुती मंदिर चौक - आप्पा बळवंत चौक - टकले हवेली चौक - उजवीकडे वळून न्यु इंग्लीश स्कूल - ओंकारेश्वर मंदिर एकुण विसर्जन गणपती - ७०
- क्वार्टर गेट ते बेलबाग चौक सेक्टर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे बंदोबस्ताबाबत.

श्री. डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर हे गणपती विसर्जनाच्या सर्व बंदोबस्ताचे देखरेख अधिकारी राहतील. त्यांचे मदतीस खालील प्रमाणे पोलीस अधिकारी राहतील.

१. श्री.श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर. मोबा- ८६०५०१७०८२ टिळक रोड, कुमठेकर रोड, केळकर रोड व बेलबाग चौक व संपुर्ण लक्ष्मीरोड बंदोबस्त देखरेख अधिकारी असतील.

२. श्री.सुनिल फुलारी , अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर. मोबा-९७६३६१६१६१परिमंडळ ३, ४ मधील बंदोबस्त देखरेख अधिकारी असतील. त्यांचे प्रादेशिक विभागातील बंदोबस्त संपल्यानंतर टिळक चौक ते नटराज विसर्जन घाट दरम्यान विसर्जन बंदोबस्तावर देखरेख करतील.

३ श्री.अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर. मोबा- ९८६७४६११३८ अलका टॉकीज चौक बंदोबस्त देखरेख अधिकारी असतील.

४. श्री डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त प्रशासन, पुणे शहर, मोबा. नं. ९८२३८७२०७२ हे परिमंडळ -२, मधील बंदोबस्ताचे देखरेख अधिकारी राहतील व त्यानंतर टिळक चौक, शास्त्री रोडवरील विसर्जन व एस.एम.जोशी पुल विसर्जन घाट चे देखरेख अधिकारी म्हणुन काम पाहतील.

- मुख्य गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी लावण्यात आलेला बंदोबस्त समरी

| अपोआ | पोउआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउनि | कर्मचारी | एस.आर,पी.एफ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | १२ | २९ | ८९ | २६७ | ३१३८ | ०२ कंपन्या |

- पोलीस स्टेशन स्तरावर गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी लावण्यात आलेला बंदोबस्त समरी

| पोनि | सपोनि/पोउनि | कर्मचारी |
|---|---|---|
| ६१ | १९४ | ४३१९ |

- पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामध्ये व मुख्य विसर्जन मिरवणुकीकरीता लावण्यात आलेला एकुण बंदोबस्त समरी

| अपोआ | पोउआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउनि | कर्मचारी | एस.आर,पी.एफ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | १२ | २९ | १५० | ४६१ | ७४५७ | ०२ कंपन्या |

PRESS NOTE 2018

पोलीस आयुक्तलयास बाहेरील घटकातुन मिळालेला एकुण बंदोबस्त

| अपोआ | पोउआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउनि | कर्मचारी | एस.आर,पी.एफ | होमगार्ड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| -- | ०२ | ०८ | १६ | ८० | २५० | ०२ | २९३ |

- सन २०१९ गणेशोत्सव कालावधीत पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ **ध्वनी प्रदुषण** (नियमन व नियंत्रण) नियम २००० अंतर्गत दिनांक ०२/९९/२०१९ ते आजपावेतो केलेली **कारवाई**

| एकुण | निर्गती | तपासावर |
|---|---|---|
| १२ | -- | १२ |

- **सन -२०१९ मध्ये ऑन लाईन** गणेशोत्सव मंडळांना देण्यात आलेले परवाने

| प्राप्त अर्ज | ऑन लाईन परवाने दिले | त्रुटी असल्याने अर्ज अमान्य |
|---|---|---|
| १९९४ | १७५२ | २४२ |

- **आयुक्तालयात घेण्यात आलेल्या बैठका बाबत -**
  गणेशोत्सव व मोहरम सणानिमित्त शांतता समिती, मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, गणेश मंडळांचे पदाधिकारी, ढोलताशा पथक, डी.जे. डॉल्बी चालक व मालक, आरास गुलाल विक्रते चौकी स्तरापासुन ते प्रादेशिक विभागापर्यंत घेण्यात आलेल्या बैठका अशा **एकुण ३७७** बैठका घेण्यात आल्या.
- गणेशोत्सव व मोहरम सणा निमित्त आयुक्तालयात **दहशतवाद विरोधी उपाययोजने अंतर्गत**
  १. मर्मस्थळ सुरक्षा तपासणी,२.परदेशी नागरिक पडताळणी, ३. बीडीडीएस तपासणी,४. हॉटेल लॉजेस तपासणी,५.तरुण मुले मिर्सींग आढावा या मुद्दयांना अनुसरून कार्यवाही करण्यात आलेली आहे.
- गर्दीचे नियोजन तसेच दहशतवादी कृत्य ओळखणे व त्याला सामोरे जाणेसाठी गणेश मंडळांच्या सुमारे ३८ हजारहुन अधिक कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
- पुणे पोलीस आयुक्तालयातील सर्वसामान्य प्रचलित सार्वजनिक गणेश विसर्जन करण्यात येणारे **एकुण १५३** घाट असुन त्यापैकी अनंतचतुर्थी दिवशी **एकुण ७५ घाटावर** सार्वजनिक गणेश विसर्जन होणार आहे.


पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
सार्वजनिक गणेशोत्सव २०१९